# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दू. क्र. : ०२२ ६६४०५०६६, ६६४०६०६७, ६६४०५०७७ Email Id – cpromhada@gmail.com


जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/ ३१०० दि. १४/१०/२०२१

प्रसिद्धी पत्रक

**म्हाडा मुंबई मंडळाच्या अखत्यारीतील ५६ पैकी काही वसाहतींच्या समूह पुनर्विकासासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील -** गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड

कोंकण मंडळाच्या ८९८४ सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत उत्साहात

मुंबई, दि. १४ ऑक्टोबर, २०२१:- मुंबई शहराच्या सिमीत भौगोलिक कक्षा व घरांची वाढती मागणी या बाबींचा विचार करता म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या अखत्यारीतील ५६ पैकी काही वसाहतींचा समूह पुनर्विकास करून सर्वसामान्य नागरिकांकरिता मोठ्या प्रमाणात गृहसाठा उपलब्ध करून देण्याकरिता महाराष्ट्र शासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी केले.

ठाणे पश्चिम येथील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा विभागीय घटक) ठाणे, सिंधुदुर्ग, पालघर जिल्ह्यांतील विविध गृहनिर्माण प्रकल्प अंतर्गत उभारलेल्या ८९८४ सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडतीचा शुभारंभ गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते आज करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

डॉ. आव्हाड पुढे म्हणाले की, मुंबई शहरात अधिकाधिक परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध आहे म्हणूनच अनेक वर्षांपासून प्रलंबित गोरेगाव पश्चिम येथील मोतीलाल नगर पुनर्विकास प्रकल्पाचा प्रश्न महाराष्ट्र शासनाने सोडविला असून नुकतीच या प्रकल्पाची निविदा प्रकाशित केली आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना सुमारे ३३ हजार परवडणारी घरे उपलब्ध होतील. याच धर्तीवर टागोर नगर, कन्नमवार नगर मधील फक्त एका इमारतीला पुनर्विकासासाठी मान्यता न देता सर्व इमारतींच्या पुनर्विकासाचा एकत्रित आराखडा तयार करावा. यामुळे वसाहतींचे सुटसुटीत नियोजन करून पायाभूत सुविधांवरील ताण कमी करता येईल, असेही मत त्यांनी याप्रसंगी मांडले.

कोंकण मंडळाच्या ८९८४ सदनिकांसाठी २ लाख ४६ हजार ६५० विक्रमी अर्ज प्राप्त झाले आहेत. यावरून सर्वसामान्यांना परवडणाऱ्या घरांची निकड पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. कोविड साथरोग व त्या पार्श्वभूमीवर लागू टाळेबंदीमुळे हक्काचे घर असावे ही संकल्पना नागरीकांमध्ये वाढत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कमीत कमी कालावधीत परवडणाऱ्या दरात गृहनिर्मिती करण्याचे आव्हान म्हाडासमोर आहे. म्हाडा हे आव्हान नक्की स्वीकारेल व सक्षमतेने पेलेल, असा आशावाद डॉ. आव्हाड यांनी याप्रसंगी व्यक्त केला. म्हाडाची विश्वासार्हता व सोडतीची पारदर्शक प्रक्रिया यामुळेच नागरिकांचा या सोडतीला प्रतिसाद मिळाला आहे. म्हाडावरील या विश्वासामुळे 'गाव तिथे म्हाडा' ही संकल्पना राबविली जाणार आहे. तळीये (जि. रायगड) या पूरग्रस्त गावाचे पुनर्वसन सामाजिक बांधिलकी म्हणून म्हाडातर्फे केले जाणार आहे. या गावातील ग्रामस्थांसाठी ६०० चौरस फुटाची २६१ घरे म्हाडा लवकरच उभारणार आहे, असे डॉ. आव्हाड यांनी सांगितले. मुंबईवरील ताण कमी करण्यासाठी ठाणे जिल्ह्यात महाराष्ट्र शासनाने म्हाडाला जमीन उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी डॉ. आव्हाड यांनी केली. जिल्हाधिकाऱ्यांकडे लवकरच यासंदर्भात बैठक घेण्यात येणार असून शासनाने म्हाडाला जमीन उपलब्ध करून दिल्यास मोठ्या प्रमाणात परवडणाऱ्या घरांची उभारणी करता येऊ शकेल असे डॉ.

आव्हाड म्हणाले. ठाण्यातील वर्तक नगर  येथे लवकरच १२०० घरांची उभारणी म्हाडातर्फे केली जाणार असून यातील ४०० घरे पोलिसांना दिली जाणार असल्याचे डॉ. आव्हाड यांनी सांगितले. प्री फॅब तंत्रज्ञानाचा वापर करून कमीत कमी कालावधीत अधिकाधिक घरांची निर्मिती करावी अशा सूचना डॉ. आव्हाड यांनी याप्रसंगी केली. वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील पुनर्वसन इमारतींच्या बांधकामाला वेग आला असून महानगरपालिकेच्या निवडणुकीपूर्वी सदर इमारतींच्या चौदा मजल्याचे काम पूर्ण होईल, असे डॉ.आव्हाड यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र राज्याचे नगर विकास व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री श्री एकनाथ शिंदे म्हणाले की, कोकण मंडळाच्या सोडतीला अर्जदारांचा मिळालेला प्रतिसाद ही कौतुकास्पद बाब आहे. महाराष्ट्र राज्य शासनाने कोरोनाच्या काळातही मोठ्या प्रमाणात विकास कामे हाती घेऊन ते पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्न केले. आज निघत असलेली सोडत हे त्याचेच फलित आहे. राज्य शासनाला कोरोना तसेच इतर नैसर्गिक आपत्तींमुळे आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतोय. मात्र, अशा परिस्थितीतही राज्य शासनाने विकासकामांना कुठेही कात्री लावलेली नाही. परवडणाऱ्या घरांच्या उपलब्धतेसाठी नगर विकास विभागाने अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले असून त्यामुळे म्हाडामार्फत अधिक घरे उपलब्ध होण्यासाठी मदत होणार आहे. ठाणे जिल्ह्यात म्हाडाला परवडणाऱ्या घरांच्या उभारणीसाठी जमीन उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे श्री. शिंदे यांनी सांगितले.

केंद्रीय पंचायत राज विभागाचे राज्यमंत्री श्री. कपिल पाटील यांनी म्हाडाच्या कोंकण मंडळातर्फे ठाणे येथे सोडत आयोजित केल्याबद्दल म्हाडाचे अभिनंदन केले. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) च्या माध्यमातून परवडणारी घरे उभारण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील अधिकाधिक महापालिकांनी पुढे येण्यासाठी राज्य शासनाच्या गृहनिर्माण विभागाने प्रयत्न करावेत, असे आवाहन श्री. पाटील यांनी केले.

सदर सोडतीला मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती श्री. विनोद घोसाळकर, आमदार रविंद्र फाटक, मिरा भाइंदर महानगरपालिकेचे आयुक्त श्री. ढोले, उच्चस्तरीय देखरेख समितीचे श्री. सुरेश कुमार, श्री. मोईज हुसेन अली, श्रीमती शिरीन लोखंडे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.


सदर सोडतीचे थेट प्रक्षेपण (Live telecast) म्हाडाने उपलब्ध करून दिलेल्या वेब कास्टिंग सुविधेच्या माध्यमातून ६१ देशातील सुमारे ०१ लाख ०१ हजार ४४ नागरिकांनी घरबसल्या बघितले.

सोडतीचा निकाल आज सायंकाळी सहा वाजता म्हाडाच्या https://lottery.mhada.gov.in व https://mhada.gov.in या संकेतस्थळांवर प्रसिद्ध केला जाणार आहे.

प्रास्ताविक कोंकण मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. नितीन महाजन यांनी केले.

सही/-
(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा




MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHORITY
Login to Lottery System
Username
Password
Login
Forgot Your Password ?Click Here



मा. श्री. विजय नाहटा
श्री. कुमार केतकर
डॉ. श्रीकांत शिंदे
मा. श्री. बाळाराम पाटील
मा. श्री. किसन कथोरे
मा. श्री. प्रताप सरनाईक


कोकण गृहनिर्माण व
क्षेत्रविकास मंडळ
संगणकीय सोडत


MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHORITY


सन्माननीय उपस्थिती
म्हाडा
मा. ना. श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील
राज्यमंत्री, गृह (शहरे), गृहनिर्माण, परिवहन, माहिती तंत्रज्ञान,
संसदीय कार्य, माजी सैनिक कल्याण
मा. श्री. नरेश म्हस्के
महापौर,
ठाणे महानगरपालिका
मा. श्री. विनोद घोसाळकर
सभापती,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
मा. श्री. विजय नाहटा
सभापती,
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ
मा. डॉ. विनय सहस्त्रबुध्दे
राज्यसभा सदस्य
मा. श्री. कुमार केतकर
राज्यसभा सदस्य
मा. श्री. राजन विचारे
लोकसभा सदस्य
मा. डॉ. श्रीकांत शिंदे
लोकसभा सदस्य
मा. श्री. निरंजन डावखरे
विधानपरिषद सदस्य
मा. श्री. रविंद्र फाटक
विधानपरिषद सदस्य
मा. श्री. रमेश पाटील
विधानसभा सदस्य
मा. श्री. गणेश नाईक
विधानसभा सदस्य
मा. श्री. दौलत दरोडा
विधानसभा सदस्य
मा. श्री. रविंद्र चव्हाण
विधानसभा सदस्य
मा. श्री. गणपत गायकवाड
विधानसभा सदस्य
मा. श्रीम. मंदा म्हात्रे
विधानसभा सदस्य
मा. श्री. कुमार आयलानी
विधानसभा सदस्य
मा. श्री. रईस शेख


MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHORITY
KONKAN LOTTERY 2021
Scheme - 271A KHONI, TAL. KALYAN UNDER PMAY(U)
START


RASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHORITY
AN LOTTERY 2021
0 PARSIK NAGAR, THANE.M/S. WADHWA CONSTRUCTION
म्हाडा


कोकण गृहनिर्माण
क्षेत्रविकास मंडळ
Run Lottery


क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा विभागीय घटक)
पालघर, सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील
२८४ सदनिका विक्रीसाठी
म्हाडा
MHADA
KONKAN LOTTERY 2021
Go Back
Scheme - 302 SR. NO. 73, 512/1,


SC 9 1 0 1
ST 11 1 0 1
JR 1 1 1
12


PH 4 1 0
EX 1 1 0
ERNMENT
SG 9 0
113 0
148




Pages
More Options
Page Sizing & Handling
Poster
Multiple
Summarize Comments
Scale: 94%
8.27 x 11.69 Inches


Category Wise Application Count
Category Code
Applications
Actual Tenement
SC
ST
EX